**प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (सर्वसाधारण) घटकांतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाच्या हिश्श्याचा प्रशासकीय निधीसह निधी रु. ६९६,७१,८०,०००/- व राज्य समरुप हिस्सा रु. ४६४,४७,८६,६६८/-एवढा निधी वितरीत करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः** प्रआयो-**२०२५/**प्र.क्र.११६/**E-११९१०३२/**योजना-**१०**

**बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,**

**फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**

**तारीख :** २८ **फेब्रुवारी, २०२६.**

**वाचा :**

१) ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार,नवी दिल्ली यांचे क्र. F.No.१२३६/Finance /२०२५-२६ दि.२६.०२.२०२६ रोजीचे आदेश.

२) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांचे पत्र क्र.जा.क्र. राव्यक-ग्रागृ/ लेखा (प्रआयो)/सर्वसाधारण/२०२६/१७७, दि.२७.०२.२०२६.

३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५.

४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा- ४, दि.३०.०७.२०२५.

**प्रस्तावना :**

"सर्वांसाठी घरे"हे केंद्र शासनाचे धोरण असून, राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान योजना राबविण्यात येत आहेत. तसेच, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या धर्तीवर विविध प्रवर्गांकरीता राज्य पुरस्कृत आवास योजना राबविण्यात येत आहेत. सदरील सर्व योजनांची अंमलबजावणी ग्राम विकास विभागांतर्गत स्थापित राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक २६.०२.२०२६ रोजीचे आदेशान्वये राज्यास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये "सर्वसाधारण घटकांतर्गत" १३७६५६.४२ लाख (कार्यक्रम निधी रु.१३४६५८.४२ लाख + प्रशासकीय निधी रु.२९९८.०० लाख) एवढा निधी वितरीत केला आहे. त्या नूसार प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण "सर्वसाधारण घटकांतर्गत" सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीमधून सदर योजनेकरीता समरुप राज्य हिश्श्यासह निधी वितरीत करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**(कृ.मा.प.)**

**<u>शासन निर्णय :</u>**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) "सर्वसाधारण घटकांतर्गत" केंद्र शासनाने सन २०२५-२६ या वर्षासाठी वितरीत केलेल्या एकुण रुपये १३७६,५६,४२,९६४/- निधीपैकी रुपये ६९६,७१,८०,०००/- (कार्यक्रम निधी रु.६६६,७३,८०,०००/- + प्रशासकीय निधी रु.२९,९८,००,०००/-)(अक्षरी रुपये सहाशे शहान्नव कोटी एकात्तर लक्ष ऐशी हजार फक्त) व राज्य समरुप हिस्सा रु.४६४,४७,८६,६६८/- (कार्यक्रम निधी रु.४४४,४९,२०,०००/- + प्रशासकीय निधी रु.१९,९८,६६,६६८/-) (अक्षरी रुपये चारशे चौसष्ट कोटी सत्तेचाळीस लक्ष शहाऐंशी हजार सहाशे अडुसष्ट फक्त) असे एकूण रु.११६१,१९,६६,६६८/- (अक्षरी रुपये एक हजार एकशे एकसष्ट कोटी एकोणावीस लक्ष सहासष्ट हजार सहाशे अडूसष्ट फक्त) एवढा निधी खर्च करण्यास व अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेंतर्गत २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये एकुण रु.११६१,१९,६६,६६८/- (अक्षरी रुपये एक हजार एकशे एकसष्ट कोटी एकोणावीस लक्ष सहासष्ट हजार सहाशे अडूसष्ट फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे (B.D.S.) संचालक, राज्य व्यवस्थान कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्याकडे खालील लेखाशिर्ष अंतर्गत वितरीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | वितरीत करावयाचा निधी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मागणी क्रमांक एल-३, (०१)(०४) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) - सर्वसाधारण (केंद्र पुरस्कृत योजना) (केंद्राचा हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) **(२५०५३०१२)** | **रु. ६९६,७१,८०,०००/-** |
| २ | मागणी क्रमांक एल-३, ६०, इतर कार्यक्रम ७०२, जवाहर ग्राम समृध्दी योजना (०१) प्रधानमंत्री आवास योजना (०१)(०१) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)- सर्वसाधारण योजना (राज्य हिस्सा ४० टक्के) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) **(२५०५०५६८)** | **रु. ४६४,४७,८६,६६८/-** |
| | **एकुण** | **रु.११६१,१९,६६,६६८/-** |

३. या शासन निर्णयाव्दारे वितरीत होणारा निधी उपरोक्त लेखाशिर्षासाठी सन २०२५-२६ करीता अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा.

४. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही योजना केंद्र पुरस्कृत असल्याने, या योजनेसाठी SNA-SPARSH प्रणाली लागू असल्यामुळे या शासन निर्णयाद्वारे वितरीत होणारा निधी सन २०२५-२६ करीता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून SNA- SPARSH खात्यामधून खर्ची टाकावा.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेले अनुदान कोषागारातून काढल्यानंतर पुढील माहिती कार्यासन योजना-२ यांना सादर करण्यात यावी. १) मंजूर केलेली रक्कम, २) कोषागारातून काढलेली

रक्कम, ३) रक्कम काढल्याचा देयक क्रमांक व दिनांक, ४) महालेखापाल कार्यालयात नोंद झालेल्या रकमेशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र.

६. प्रस्तुत निधीबाबत उपसंचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण-गृहनिर्माण हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून (संकेतांक क्रमांक ८१०११२०००५) तसेच संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण - गृहनिर्माण हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील.

७. सदर अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्याची व कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अन्यथा वित्तीय अनियमीतता समजण्यात येईल याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. तसेच, सदरचा निधि विहित कालावधीत खर्च करण्याची खबरदारी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण-गृहनिर्माण यांनी घ्यावी.

८. सदर शासन निर्णय, वित्त विभागाकडिल शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ अन्वये, केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत निधी वितरणाबाबतच्या अटी व शर्तीनुसार तसेच विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२२८१६३५५९४३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHASHIKANT D TIJARE

Digitally signed by SHASHIKANT D TIJARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Rural Development Department, 2.5.4.20=E1E60B788875C086F4BC546AEFE13773C3D89B2D2497473FC2F335C58C20C42C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E7125EA0D83A0ACA0212D600BE2759B362F98CA65C0F42D0E6ABB896D8991D46, cn=SHASHIKANT D TIJARE
Date: 2026.02.28 16:53:44 +05'30'

(श.ज्ञा.तिजारे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (पाच जादा प्रतींसह)
२) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, ४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, बेलापूर,नवी मुंबई.
३) सायबर कोषागार अधिकारी, सायबर कोषागार कार्यालय, मुंबई.
४) नियोजन विभाग (का.१४४४) , मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) वित्त विभाग (व्यय-१५) व (अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) कार्यासन अधिकारी, वित्त-७, वित्त-१, योजना-१, योजना-२, योजना-५ व योजना-७, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
७) निवड नस्ती (योजना-१०).